दाखल दिनांकः— ३०.०४.२०१०.
नोंदणी दिनांकः— ३०.०४.२०१०.
निकाल दिनांकः— २३.०१.२०१३
कालावधी :— वर्ष महिने दिवस
०२ ०८ २३

**कुडाळ येथील सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ यांचे न्यायालयात**
**(रो. प्रे. यादव यांचेसमोर)**

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६०/२०१०.
निशाणी क्रमांक

विनायक सहदेव अणावकर. )
उ. व. ५८ वर्षे, धंदा — शेती. )
रा. मु. पो. अणाव, ता. कुडाळ. )
जिल्हा—सिंधुदुर्ग. )... वादी

**विरुध्द**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, )
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, ओरोस. )
२. उपअभियंता बांधकाम. )
विभाग अधिकारी पंचायत समिती, कुडाळ. )
३. आनंद कृष्णा भोगले. )
व.व.४६, धंदा—शेती. )
रा. मु. पो. वेताळबांबर्डे. )
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. )
४. विजय सहदेव अणावकर. )
व.व. ५५, धंदा—नोकरी, )
५. सुशिल सहदेव अणावकर. )
व.व. ५३, धंदा—नोकरी, )
प्रतिवादी नं. ४ व नं. ५ — )
राहणार बी.एम.सी. कॉलनी, )
'इ' बिल्डिंग, रुम नं. ६, )
पहिला मजला, )... प्रतिवादी

अरुणकुमार वैद्य मार्ग, पिंपरीपाडा )
जवळ, मालाड (पू.) मुंबई )....प्रतिवादी

दावा ताकीदीकरता.

वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ तर्फे वकील श्री. एस्.एस्.सावंत
प्रतिवादी क्र. १ एकतर्फी.
प्रतिवादी क्र. २ —स्वत:
प्रतिवादी क्र. ३ तर्फे वकील श्री. एस्.डी. देसाई व सौ. जी.एस्. देसाई.

## —:— न्या य नि र्ण य —:—

(घोषित केला दिनांक २३ माहे जानेवारी, सन २०१३)

१ प्रस्तुतचा दावा हा ताकीदीकरता आहे.

२ वादीची कथने संक्षिप्तमध्ये खालीलप्रमाणे आहेत.

२अ. गांव मौजे अणाव, तालुका कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, येथील स्थावर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | ११९ | ७ | ०—४२—०<br>पो. ख.०—१२—० | ०.१४ |

(वरील मिळकतीला यापुढे ‘दावा मिळकत’ असे संबोधिले आहे. )

२ब. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या मालकी, कब्जाभोग्य कसवट वहिवाटीची असून त्यात वादी कुटुंबाच्या मालकीची व उपर्जनेची काजू, रतांबा, जांभळ वगैरे उत्पन्न देणारी झाडे आहेत व त्यापासून येणा—या उत्पन्नावर व शेतीवर वादी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. दावा मिळकतीचे पुर्वेस वादी कुटुंबाच्या मालकीची सर्वे नं. १६५, हि. नं. २१ व २२

मधून पणदूर सुकळवाड मुख्य रस्त्याकडून, शेळणवाडीकडे दक्षिण उत्तर जाणारी पुर्वांपारपासूनची वाट असून त्या वाटेचा वापर शेळणवाडीकडे जाणारे लोक करतात व त्यास वादीची कोणतीही हरकत नाही. असे असता कोणत्याही कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता ग्रामपंचायत अणाव यांनी नविन रस्ता काढण्याची धमकी दिनांक २६.०६.२००६, रोजी वादीला दिली व त्याविरोधात रे. मु. नं. १०९/२००६ वादीने दाखल केला.

२क. दिनांक १९.०२.२०१० रोजी प्रतिवाद क्र. ३ गावातील काही लोकांसह जे.सी.बी. घेवून दावा जमिनीत घुसला व जमिनीची नासधूस करु लागला. दावा जमिनीतील काजू, किंजळ झाडांची तोड करुन र.रु.१०,०००/— चे नुकसान केले व रस्त्याचे खोद काम केले. वादी व वादीचे पत्नीस मारहाण केली. कोणतीही वर्क ऑर्डर न काढता, वादीची परवानगी न घेता प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आमदार निधीतून रस्ता केला व प्रतिवादी क्र. ३ ने प्रत्यक्षात रस्त्यचे काम करुन वादीच्या जमिनीतून मधोमध रस्ता काढून जमिनीचे दोन भाग केले व गटारे मारली.

२ड. दिनांक २८.०४.२०१०, रोजी पुन्हा दोन दोन फुटी गटारे मारली व विचारणा केली असता प्रतिवादी क्र. ३ ने “यापुर्वी झालेली मारहाण पुरे झाली नाही, पुन्हा आलात तर हातपाय तोडणार” अशी धमकी दिली व सांगितले की, “दावा जमिनीत आम्ही दुहेरीकरण करणार व आणखी लागली तरही तुमची जमिन घेणार व संपुर्ण जमिनीत डांबरीकरण करुन टाकणार”. प्रतिवादी बोलल्याप्रमाणे खरे करेल अशी वादीला भिती वाटते व तसे झाल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. सबब, दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी रस्त्याचे खोदकाम करुन नये, बांधकाम करु नये व झाडे तोडून जमिनीची नासधुस करु नये अशा कायमच्या ताकीदीकरता व वादीच्या दावा मिळकतीत केलेला रस्ता काढून टाकून वादीची जमिन पुर्ववत करुन दयावी या आज्ञार्थी ताकीदीसाठी वादीने हा दावा दाखल केला आहे.

३. दावा समन्सची बजावणी होवून देखिल प्रतिवादी क्र. १ हजर न झाल्याने दाव्याचे काम त्याचेविरुध्द एकतर्फी चालले. प्रतिवादी क्र. २ व ३ हे दाव्याकामी हजर झाले, परंतु, पुरेशी संधी देवूनही आपली कैफियत सादर न केल्याने सदर दावा त्यांचे कैफियतीविना चालला. या दाव्याकामी प्रतिवादी क्र. ३ व ४ यांनी नि. ४२ वर आपली कैफियत सादर करुन वादीचा दावा त्यांनी मान्य केला आहे. परंतु, वादीच्या नुकसानीस त्यांना जबाबदार धरु नये अशी विनंती केली आहे.

४. दाव्याचे निर्णयाकामी माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यापुढे नमूद केलेल्या कारणास्तव मुद्दयांवरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | दावा मिळकत वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या मालकी, कब्जाभोग्य व कसवट– वहिवाटीची असल्याचे वादी सिध्द करतो का? | होकारार्थी. |
| २. | दावा मिळकतीतून प्रतिवादी क्र. १ ते ३ अनधिकृतपणे रस्ता काढून, वादीची झाडे तोडून बांधकाम करत असल्याचे वादी सिध्द करतो का? | होकारार्थी. |
| ३. | वादी प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द कायम ताकीद मिळविणेस पात्र आहे काय? | होकारार्थी. |
| ४. | वादी प्रतिवादी क्र. १ ते ३ विरुध्द आज्ञार्थी ताकीद मिळविणेस पात्र आहे काय? | होकारार्थी. |
| ५. | आदेश व हुकूमनामा काय? | अंतिम आदेशानुसार दावा मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

५. वादीने दाव्याचे पृष्ठयर्थ स्वत:च्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (वा.सा.क्र. १) (नि.५९) सादर केले आहे. तसेच, वादीने नारायण धोंडू गावडे(वा.सा.क्र.२) (नि.६१) यांची साक्ष घेतली. वादीने कागदोपत्री पुरावाही दाखल केलेला असून त्याचा उल्लेख यापुढे योग्य त्या ठिकाणी करण्यात येत आहे.

६. प्रतिवादींतर्फे कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

मुद्दे क्रमांक १ ते ४ :—

७. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रात चर्चिले आहेत.

८. वादीने नि. ५९ वर सादर केलेल्या आपल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात आपल्या दाव्यातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार दावा मिळकतीत त्याची व प्रतिवादी क्र. ४ व ५ याची मालकी, कब्जाभोग्य, कसवट वहिवाट असून त्यात त्याचे उपर्जनेची काजू, रतांबा, जांभळ वगैरे झाडे आहेत व त्यावर त्याचा उदरनिर्वाह चालतो. त्याच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीच्या पूर्वेस त्याच्या कुटुंबाच्या मालकीची सर्व्हे नं. १६५ हि. नं. २१ व २२ मधून पणदूर सुकळवाड मुख्य रस्त्याकडून शेळणवाडीकडे दक्षिणोत्तर जाणारी पुर्वापार वाट असून त्याचा वापर शेळणवाडीचे लोक करतात व त्यास वादीची कोणतीही हरकत नाही, वादी कुटुंबाची त्यास संमत्ती आहे. परंतु, कोणत्याही कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता ग्रामपंचायत, अणाव यांनी जे. सी.बी. ने दावा मिळकतीत येवून काजू, किंजळ या झाडांची तोड करुन नासधुस केली, वादी व त्याचे पत्नीस मारहाण केली व वादीच्या परवानगीशिवाय आमदार निधीतून खर्च करुन वादीच्या जमिनीतून मधोमध रस्ता काढून त्याच्या जमिनीचे दोन भाग करुन नुकसान केले. त्याच्या म्हणण्यानुसार, पोलिस ठाण्यात तक्रारी

करुनही काहीही फायदा झाला नाही, उलट वादीला हातपाय तोडण्याची तसेच जमिनीतून रस्त्याचे दुहेरीकरण करण्याची प्रतिवादी क्र. १ ने धमकी दिली. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीत रस्त्याचे बांधकाम करु नये, झाडांची तोड करु नये, दावा मिळकतीची नासधूस करु नये तसेच जमिनीचे मुल्य कमी होईल असे कोणतेही कृत्य करु नये अशी कायमची ताकीद देणेत यावी तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी  रस्ता काढून टाकून जमिन पुर्ववत करु दयावी अशी आज्ञार्थी ताकीद दयावी तसेच दाव्याचा खर्च र.रु. १०,०००/— प्रतिवादींकडून वसूल होवून मिळावा अशी वादीने विनंती केली आहे.

९.  वादीने त्याच्या पुराव्यास पुष्टी आणण्याकरता नारायण (वा.सा.क्र.२) याला तपासले आहे. त्याने त्याच्या सरतपासात सांगितले आहे की, दावा मिळकत ही त्याच्या माहीतीची असून वादीची आहे. दिनांक १९.०२.२०१० रोजी प्रतिवादी क्र. ३ हा दावा मिळकत साफ करण्यासाठी जे.सी.बी. व मजूर घेवून आला होता व जे.सी.बी.द्वारे त्याने दावा मिळकतीच्या दोन्ही बाजूंनी चर मारले. त्यामुळे दावा मिळकतीतील झाडांचे नुकसान झाले. सदरची घटना त्यांनी प्रत्यक्ष बघितल्याचे सांगितले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, दावा मिळकतीत कुठलाही रस्ता अस्तित्वात नव्हता. सदर साक्षीदाराच्या प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासाचे वेळी त्याला सुचविले गेले की, घटनेदिवशी तो गावी नव्हता व त्या दिवशी प्रतिवादी क्र. ३ दावा मिळकत साफ करण्यासाठी आला नव्हता. त्याने सदरची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्याने उलटतपासाचे वेळी सदरची घटना प्रत्यक्ष न पाहील्याबाबतच्या सुचित प्रश्नासही नकारार्थी उत्तर दिलेले आहे. प्रतिवादींतर्फे घेण्यात आलेल्या सदर साक्षीदाराचे उलटतपासातून प्रतिवादींस उपयुक्त असे काहीही निष्पन्न झालेले आहे. सदर साक्षीदाराने वादीच्या कथनास पुर्णपणे पुष्टी आणली आहे. वादीच्या व सदर साक्षीदाराचे कथनास प्रतिवादींनी आपली कैफियत सादर करुन किंवा कोणत्याही प्रकारे पुरावा देवून आव्हान दिलेले नाही. त्यामुळे वादींची व सदर साक्षीदाराची कथने नाकारण्यास न्यायालयापुढे कोणतेही कारण नाही.

१०. वादीने आपल्या दाव्याचे पृष्ठयर्थ सादर केलेल्या दावा मिळकतीच्या सातबारा उता—याचे (नि.७) अवलोकन करता, भोगवटदार सदरी वादी व प्रतिवादी क्र. ४ व ५ यांची, नांवे नमूद आहेत. परंतु, पिकपहाणी सदरी 'कवळकाड' एवढेच नमूद असून कोणत्याही झाडांची नोंद नाही. त्याच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीच्या पुर्वेस शेळणवाडीतील लोकांना जाणेयेण्याकरता वाट असून प्रतिवादी क्र. १ ते ३ दावा मिळकतीतून मधोमध रस्ता काढून अनधिकृत बांधकाम करत आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीचे कथनास आव्हान देण्यास आपली कैफियत अगर कोणताही सबळ पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे वादीच्या दाव्यातील कथने नाकारण्यास न्यायालयासमोर कोणतेही कारण नाही. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीच्या मधोमध रस्ता खोदून जमिनीची नासधूस केली व नुकसान केले. वादीने आपल्या दाव्याचे पृष्ठयर्थ नि. ५ चे यादीसोबत तीन छायाचित्रे हजर केली आहेत. परंतु, ती छायाचित्रे योग्य साक्षीदारामार्फत किंवा सबळ पुराव्याने सिध्द करणेस वादी अपयशी ठरला आहे. वादीने शपथेवर जमिनीतून मधोमध रस्ता खणून रस्त्याची नासधूस केली असे सांगितले आहे. त्यास नारायण (वा.सा.क्र.२) यानेही पुष्टी दिली आहे. प्रतिवादींतर्फे सदर साक्षीदारांचा उलटतपास घेवून सदरची बाब नाकारलेली नाही. त्यामुळे वादीच्या मागणीप्रमाणे आज्ञार्थी ताकीद मिळविणेस वादी पात्र आहे. परंतु, नुकसान भरपाईबाबत विचार करता वादीचे नेमके काय व किती रुपयांचे नुकसान झाले हे न्यायालयासमोर स्पष्टपणे आलेले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई मिळविणेस वादी पात्र ठरत नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीला दिलेल्या धमकीनुसार ते मिळकतीतील झाडे तोडून मिळकतीच्या मधोमध रस्त्याचे बांधकाम करणार असल्याची वादीची भिती ही साधार आहे. कारण त्यास प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारे आव्हान दिलेले नाही. त्यामुळे वादीच्या भितीनुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ जर दावा मिळकतीत अनधिकृत रस्त्याचे बांधकाम करण्यात यशस्वी झाले, तर त्यामुळे वादीचे न्याय्य हक्कास बाधा येणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीत कोणतेही रस्त्याचे खोदकाम व बांधकाम करु नये, दावा मिळकतीतील झाडांची तोड करुन मिळकतीची नासधुस

करु नये व जमिनीचे मुल्य कमी होईल असे कोणतेही कृत्य करु नये अशी कायमची ताकीद करणे योग्य वाटते. प्रतिवादींचे कैफियतीअभावी किंवा पुराव्याअभावी वादीचे हेही कथन नाकारता येणारे नाही. त्यामुळे मी मुद्दे क्रमांक १ ते ४ चे निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

११. एकंदर पुराव्याचा विचार करता, वादीचा दावा मंजूर होण्यास पात्र आहे. परिणामी, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीत कोणतेही रस्त्याचे खोदकाम व बांधकाम करु नये, तसेच, दावा मिळकतीतील झाडांची तोड करुन मिळकतीची नासधुस करु नये व जमिनीचे मुल्य कमी होईल असे कोणतेही कृत्य करु नये अशी त्यांना कायमची ताकीद देण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकत पुर्ववत करुन दयावी अशी त्यांना आज्ञार्थी ताकीद देण्यात येत आहे.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

सही/—

( रो. प्रे. यादव.)
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर.
कुडाळ.

दिनांक : २३.०१.२०१३.